# University of Mumbai

Phone - 022 – 2265 2816
E-mail - *dy.registrar.tau@fort.mu.ac.in*

**Academic Appointments & Qaulity Insurance (AAQA)**
UNIVERSITY of MUMBAI,
Fort Campus, M.G. Road, Mumbai - 32

**एएक्यूए/आयसीडी/२०२३–२०२४/१६९८**

परिपत्रकः—

**विषयः— स्थायी/अस्थायी शिक्षकांचे उपस्थिती अहवाल सादर करणेबाबत...**

विद्यापीठाच्या विविध अनुदानित/विनाअनुदानित विभाग/संस्थाचे संचालक/ विभागप्रमुख, प्राचार्य, सर ज. जी वास्तुशास्त्र महाविद्यालय, समन्वयक, रत्नागिरी/ठाणे व कल्याण उपकेंद्र, विश्वभूषण भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, आंबडवे, विजयालक्ष्मी विश्वनाथ दळवी महाविद्यालय, तळेरे, संचालक, ज्ञानस्त्रोत केंद्र यांना कळविण्यात येते की, उपरोक्त विषयांकीत परिपत्रकाद्वारे स्थायी/अस्थायी शिक्षकांचा उपस्थिती अहवाल वित्त व लेखा विभाग, फोर्ट, मुंबई ४०० ०३२ येथे सादर करणे अनिवार्य आहे.

तरी या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, काही विभागातील शिक्षकांचे उपस्थिती अहवाल प्रत्येक महिन्याच्या पाच तारखेच्या आत वित्त व लेखा विभागास प्राप्त होत नसल्याचे निदर्शनास आले आहे. तरी सर्व विभागप्रमुख/संचालक/समन्वयक यांना सूचित करण्यात येते की, आपल्या अधिनस्त असलेल्या स्थायी/अस्थायी शिक्षकांचा उपस्थिती अहवाल वेतन कक्ष, वित्त व लेखा विभाग, फोर्ट, मुंबई ४०० ०३२ या विभागास प्रत्येक महिन्याच्या पाच तारखेपर्यंत सादर करण्यात यावेत. ज्या शिक्षकांचा उपस्थिती अहवाल वेतन कक्ष, वित्त व लेखा विभाग, फोर्ट, मुंबई ४०० ०३२ येथे प्रत्येक महिन्याच्या पाच तारखेपर्यंत सादर करण्यात येणार नाही त्यांचे वेतन रोखले अथवा वेळेवर न झाल्यास त्याची जबाबदारी विभागप्रमुख/संचालक/समन्वयक व संबंधित शिक्षकांची राहील, याची कृपया नोंद घ्यावी.

Baliram

मुंबई : ४०० ०३२
१२ फेब्रुवारी, २०२४

(डॉ. बळीराम गायकवाड)
प्रभारी कुलसचिव

मुंबई विद्यापीठाचे विविध अनुदानित/विनाअनुदानित शैक्षणिक विभाग/संस्थाचे विभागप्रमुख/संचालक प्राचार्य, सर ज. जी वास्तुशास्त्र महाविद्यालय, समन्वयक, रत्नागिरी/ठाणे व कल्याण उपकेंद्र, विश्वभूषण भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, आंबडवे, विजयालक्ष्मी विश्वनाथ दळवी महाविद्यालय, तळेरे, संचालक, ज्ञानस्त्रोत केंद्र.

AAQA/Rupali/Circular